PVG'S

# Maharashtra Institute of Printing Technology

1786,Sadashiv Peth,Pune-30
Phone : 020-24470927, 24479058, 24470573
**Fax** : 020-24470642, **E-mail** : mipt.pvg@gmail.com, **website**: https://pvgmipt.ac.in

जा. क्र. एम.आय.पी.टी./२०२३-२४/१६९ दि. २८.०७.२०२३

## कार्यालयीन परिपत्रक

विषय : राज्यातील विनानुदानित खासगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याद्वारे चालविण्यात येणाऱ्या तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थाना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार फी घेण्यास/दिलेल्या परवानगीबाबत.

संदर्भ : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन पत्र क्रमांक E.No.643897-HTED/(TE-5) दि.२७-३-२०२३
२) तंत्रशिक्षण संचानालय,मुंबई पत्र क्रमांक एनजीपी/पदविका अंतरिम शुल्क/२०२३/ ६२३, दि.२८-७-२०२३

उपरोक्त संदर्भाकीतविषयानुसार राज्यातील विनानुदानित खासगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याद्वारे चालविण्यात येणाऱ्या तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थाना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार अंतरिम शुल्क घेण्यास वरील संदर्भांकित पत्र क्रमांक. १ व २ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून परवानगी दिली आहे.

तरी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या पत्राचे अवलोकन करावे.

२८/७/२३
(श्री . पी. व्ही. शिंदे)
प्र. प्राचार्य
महाराष्ट्र मुद्रणतंत्र संस्था, पुणे-३०.

सोबत: वरील संदर्भांकित पत्र क्रमांक १ व २

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल – desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : १०/एनजीपी/पदविका अंतरिम शुल्क/२०२३/ ६२३ दिनांक : 28 JUL 2023

विषय: राज्यातील विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याव्दारे चालविण्यात येणाऱ्या तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार फी घेण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ: उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन पत्र क्रमांक: E.No. ६४३८९७-HTED/(TE-५), दिनांक : २७.७.२०२३.

राज्यातील विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याव्दारे चालविण्यात येणाऱ्या तंत्र शिक्षण देणाऱ्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार फी घेण्यास परवानगी देण्यासंबधीचे संदर्भाधीन शासन पत्र या संचालनालयास प्राप्त झालेले आहे. शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

तरी, सदर शासन पत्रात नमूद अटी व शर्तीस अनुसरुन पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व संबंधीत संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता शुल्क आकारणीबाबत कार्यवाही करावी.

(डॉ. गोविंद संगवई)
प्र.उपसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत: माहिती व कार्यवाहीसाठी.

१. मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे, त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अखत्यारीतील सर्व संबंधीत पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
२. मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
३. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या सर्व संकेतस्थळावर तसेच संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.

"जनहिताय सर्वदा"

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
४ था मजला,मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु
चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२-२२७९३५३५ Email ID : tashi५-hted@mah.gov.in

---

क्रमांक :- E No.643897-HTED/(TE-5) दिनांक -: २७ जुलै, २०२३

प्रति,

संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
३,महापालिका मार्ग,पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१.

**विषय:**-राज्यातील विनाअनुदानित खाजगी तंत्रनिकेतने आणि महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न संस्था याव्दारे चालविण्यात येणाऱ्या तंत्र शिक्षण संस्थांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात शैक्षणिक वर्ष २०२२-२३ नुसार फी घेण्यास परवानगी देण्याबाबत.

**संदर्भ:**-संचालक,तंत्रशिक्षण संचलनालय यांचे पत्र क्र.१०/ एनजीपी/ फी.नि.स. शुल्क/२०२३ /५४८ , दि.०४.०७.२०२३.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधिन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक शुल्क आकारण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. यानुषंगाने पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थांना २०२३-२४ वर्षाकरीता शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आकारण्यात आलेले शुल्क अंतरिम शुल्क म्हणून घेण्याची परवानगी खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

१. सदर परवानगी अंतरिम शुल्क हे शुल्क निश्चिती समितीच्या अंतिम शुल्काच्या मान्यतेच्या अधीन राहून असेल.
२. शुल्क निश्चिती समितीने प्रत्यक्षात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संबंधित संस्थांना शुल्क निश्चित करुन दिल्यानंतर, सदर शुल्क संस्थांकडून घेण्यात आलेल्या अंतरिम शुल्कापेक्षा जास्त असल्यास, सदर जास्तीचे शुल्क संबंधित संस्थांना विद्यार्थ्यांकडून घेता येईल.
३. शुल्क निश्चिती समितीने प्रत्यक्षात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी संबंधित संस्थांना शुल्क निश्चित करुन दिल्यानंतर, सदर शुल्क संस्थांकडून घेण्यात आलेल्या अंतरिम शुल्कापेक्षा कमी असल्यास, विद्यार्थ्यांकडून आकारण्यात आलेले जास्तीचे शुल्क संबंधित विद्यार्थ्यांना संस्थेला परत करावे लागेल.
४. सदर बाब प्रवेशाच्या वेळी संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे संस्थांना बंधनकारक आहे.

तरी उपरोक्त मान्यतेस अनुसरुन संचालक, तंत्रशिक्षण संचलनालय यांनी परिपत्रकाद्वारे संबंधितांना कळविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

अनिता तुम्मुलवार
26/06/2023

(अनिता तुम्मुलवार)

**कार्यासन अधिकारी , महाराष्ट्र शासन**

प्रत :-

संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,चौथा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा , मुंबई ४०००५१.